लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व जडण घडणीसाठी स्काऊट-गाईड उपक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत शिक्षणशास्त्र

विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी

सादर करावयाचा संशोधन आराखडा

: संशोधक :

श्री. किडीले उमाकांत भीमराव

एम.ए. (मराठी, इंग्रजी), एम.एड्., एम. फिल (शिक्षणशास्त्र)

: मार्गदर्शक :

डॉ. एस.व्ही. घुले

एम.ए. (इंग्रजी, अर्थशास्त्र), एम. एड्. सेट, पीएच.डी. (शिक्षणशास्त्र)

प्राचार्य, महात्मा गांधी अध्यापक महाविद्यालय, सिडको, नांदेड

:: संशोधन केंद्र ::

शिक्षणशास्त्र विद्यासंकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

डिसेंबर २०१७

अनुक्रमणिका

अ.क्र.	विवरण	पृष्ठ क्रमांक
१.१	प्रस्तावना	३-४
१.२	संशोधनाची गरज व महत्त्व	५
१.३	संशोधनाचे शीर्षक	५
१.४	कार्यात्मक व्याख्या	६
१.५	संशोधनाची गृहीतके	७
१.६	संशोधनाची उद्दिष्टे	७
१.७	संशोधन परिकल्पना	८
१.८	संशोधन कार्यपध्दती	८-९
१.९	सर्वेक्षण पध्दती	९-११
१.१०	जनसंख्या	११
१.११	न्यादर्श	११-१२
१.१२	संशोधनाची साधने	१२
१.१३	प्रश्नावली	१२-१३
१.१४	मुलाखती	१३-१४
१.१५	माहितीचे संकलन	१४
१.१६	संकलीत माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन	१४-१५
१.१७	निष्कर्ष, शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषय	१५
१.१८	प्रकरण योजना	१५
१.१९	संशोधनाचा कालावधी	१६
१.२०	खर्चाचे अंदाजपत्रक	१७
१.२१	संदर्भ ग्रंथसूची	१८

लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व जडण घडणीसाठी स्काऊट-गाईड उपक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास

१.१ प्रस्तावना :

शिक्षणाला मानवी जीवनात अनन्यसाधारण असे महत्त्व असून शिक्षणाशिवाय मानवी जीवन अपूर्णच होय. शिक्षण हे मानवाच्या सर्वांगीण सुधारणेचे प्रवेशद्वार आहे. शिक्षणामुळेच मानवाच्या सर्वांगीण सुधारणेचा पाया ख-या अर्थाने घातला जातो. शिक्षणामुळेच संपूर्ण जगाची प्रगतीकडे वाटचाल सुरू आहे. जीवनाचा स्तर उंचावण्याचे कार्य शिक्षणामुळेच सुलभ आणि सुकर झालेले आहे.

औपचारिक शिक्षणाने विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या क्षमतांचा विकास झालेला आहे. जग २१ व्या शतकाकडे प्रचंड वेगाने झेपावत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, संगणक प्रणालीमुळे जीवनाच्या सर्वच क्षेत्रात कमालीची जीवघेणी स्पर्धा निर्माण झालेली आहे. या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांत, शिक्षकांत व पालकांत प्रचंड स्पर्धा निर्माण झालेली आहे. या स्पर्धेत विद्यार्थी स्वतःचा सर्वांगीण विकास मात्र हरवून बसला आहे.

शारीरिक, मानसिक, बौद्धिक, अध्यात्मिक, सांस्कृतिक विकासातूनच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा पाया घातला जातो. विद्यार्थ्यांच्या या औपचारिक शिक्षणाला तसेच पाठ्यपुस्तकांच्या अध्ययन अध्यापनाला सहशालेय उपक्रमाची जोड देवून त्यांच्या नीतीमूल्यांचे अधिष्ठानही पक्के करण्याची सध्या गरज निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांमध्ये शालेय शिक्षणाबरोबरच मानवता, बंधुता, प्रेम, सत्य, अहिंसा, न्याय, त्याग, सहकार्य, धाडस, सहिष्णुता व आदर्श नागरिकत्व तसेच व्यक्तिमत्त्व विकास इत्यादी मानवी मूल्यांची जोपासना होणे ही काळाची गरज बनली आहे.

व्यक्तीपेक्षा राष्ट्र मोठे असते. राष्ट्र विकासासाठी शिक्षणाला नैतिक मूल्यांची जोड देणे गरजेचे आहे. त्यामुळेच शालेय अभ्यासक्रमात एन.सी.सी., एम.सी.सी., एन.एस.एस., समाजसेवा, कार्यानुभव, शारीरिक शिक्षण, स्काऊट गाईड इत्यादी विषयांचा अंतर्भाव केलेला आहे. स्काऊट गाईड चळवळीतून राष्ट्र विकासाचा पाया घातला जातो. विद्यार्थ्यांमध्ये साहस, धाडस, राष्ट्रभक्ती,

शीस्त, समानता, विश्वबंधुत्व, नागरिकत्व, व्यक्तिमत्त्व विकास इत्यादी उच्च मूल्यांचे शिक्षण देण्यासाठी ही चळवळ रुजविणे आवश्यक आहे.

विश्वातील धोके, संकटे, समस्या, अडचणी, नैसर्गिक आपत्ती सोडविण्याचे बाळकडू माध्यमिक स्तरावर देण्यासाठी स्काऊट गाईड ह्या उपक्रमाची खूपच गरज निर्माण झालेली आहे.

याच विचाराने प्रेरित होवून **लॉर्ड बेडेन पॉवेल** यांनी ह्या जागतिक चळवळीचा पाया घातला. संपूर्ण मानव जातीला उच्चतम मानवी मूल्यांचे अधिष्ठान मिळवून देण्याचे काम स्काऊट गाईड या चळवळीने केले आहे. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा पाया भक्कम होण्यासाठीही स्काऊट गाईडची खूप आवश्यकता आहे. 'Be Prepared' (सदैव तत्पर) हे या चळवळीचे मुख्य ब्रीद असून राष्ट्रविकास हा या चळवळीचा मुख्य हेतू आहे.

विज्ञान, तंत्रज्ञान, संगणक प्रणालीच्या आधुनिक युगाने एकीकडे प्रचंड प्रगती केली असली तरी दुसरीकडे नैतिक मूल्यांचा वेगाने -हास होतो आहे. हिंसा, द्वेष, आतंकवाद, युद्धाचे सावट, जाती आणि धर्माच्या नावाने होणारे मानवी संहार तसेच संपूर्ण जगाला असलेली अणूस्फोटाची भीती, तिस-या जागतिक महायुद्धाचे सावट यामुळे सर्वत्र भीतीचे वातावरण पसरलेले दिसत आहे. अशा या भीषण प्रसंगी स्काऊट गाईड उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांत प्रखर राष्ट्राभिमान, विश्वबंधुत्व, आदर्श नागरिकत्व निर्माण होण्याची व त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास प्रभावीपणे होण्याची व त्याचे बीजारोपण शालेय माध्यमिक स्तरावरच करण्याची गरज निर्माण झाली आहे.

तसेच प्रखर देशभक्ती, निसर्गाचे संगोपन, वृक्षारोपणाचे महत्त्व, रहदारीच्या नियमांचे पालन शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणे अत्यावश्यक आहे. एन.सी.सी., एम.सी.सी., एन.एस.एस. आणि स्काऊट गाईड तसेच शारीरिक व आरोग्य शिक्षण या व्यक्तिमत्त्वास पोषक असणा-या उपक्रमाकडे शासनाचेही नकळत दुर्लक्ष होत आहे.

म्हणूनच विश्वातील या सर्वव्यापी चळवळीतून व स्काऊट गाईड उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या आदर्श व्यक्तिमत्त्वाचे बीजारोपण कशाप्रकारे केले जाते. तसेच त्यासाठी स्काऊट गाईडमधील विविध उपक्रमांचे महत्त्व व विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व जडणघडणीसाठी प्रस्तुत उपक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास करण्याचे संशोधकाने ठरविले आहे.

१.२ संशोधनाची गरज व महत्त्व :

१) सामाजिक, शैक्षणिक, नैतिक व राष्ट्रीय मूल्यांचा होत असणारा -हास ही एक चिंतेची बाब झाली आहे.

२) वैश्विक बंधुत्व, मानवता, साहस आणि धाडस, परिश्रम, स्वावलंबन, प्रखर राष्ट्राभिमान व आदर्श नागरिकत्वाचे परिपोषण तसेच व्यक्तिमत्त्व विकासासाठी स्काऊट गाईड हा उपक्रम शालेय स्तरावर आवश्यक आहे.

३) औपचारिक शिक्षणाला शैक्षणिक व नैतिक मूल्यांचे अधिष्ठान प्राप्त करून देण्यासाठी स्काऊट गाईड उपक्रम आवश्यक आहे.

४) स्काऊट गाईड उपक्रम राबविण्याकडे शिक्षक, विद्यार्थी, पालक व मुख्याध्यापक यांचा सकारात्मक दृष्टिकोण निर्माण होणे गरजेचे आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व नैतिक विकासाची प्रक्रिया सुलभ होईल.

५) आदर्श नागरिकत्वाचे धडे देणारा व विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारा शालेय स्तरावरील सामाजिक शास्त्रांतर्गत नागरिकशास्त्र हा विषयही शासनाने बंद केलेला असल्याने स्काऊट गाईड उपक्रमातून आदर्श व्यक्तिमत्त्वाचे धडे देण्यासाठीही सदरील संशोधनाची गरज निर्माण झाली आहे.

६) स्काऊट गाईड हा एक अत्यंत महत्त्वाचा सहशालेय उपक्रम असून तो विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो.

१.३ संशोधनाचे शीर्षक :

लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व जडण घडणीसाठी स्काऊट-गाईड उपक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास

१.४ कार्यात्मक व्याख्या :

१) लातूर जिल्हा :

महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांपैकी एक महसुली जिल्हा. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांपैकी एक महत्त्वाचा जिल्हा म्हणजे लातूर. त्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८.५ ते १८.७ व उत्तर अक्षांस ७३.२५ ते ७७.५५ पूर्व रेखांश इतका असून हा जिल्हा महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या सरहद्दीवर आहे.

हा जिल्हा आग्नेय दिशेस असून त्याच्या उत्तरेस परभणी, ईशान्येस नांदेड, पूर्वेस कर्नाटक राज्य, वायव्येस बीड तर पश्चिमेस उस्मानाबाद जिल्हा आहे.

२) माध्यमिक शाळा :

शालेय आकृतीबंधात ९ वी व १० वी चे वर्ग असणारी शाळा व महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त इयत्ता ९ वी व १० वी च्या वर्गाच्या शाळांना माध्यमिक शाळा असे म्हणतात.

३) माध्यमिक शाळेतील विद्यार्थी :

शासन मान्यताप्राप्त मराठी व सेमी माध्यमाच्या शाळेत इ. ९ वी व १० वी मध्ये २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात शिकणारी मुले-मुली.

४) व्यक्तिमत्व विकास :

Personality development is the relatively enduring pattern of thoughts, feelings, and behaviours, that distinguish individuals from one another.

५) स्काऊट-गाईड :

विद्यार्थ्यांमध्ये चारित्र्य, देशभक्ती, राष्ट्राभिमान,श्रमप्रतिष्ठा, मानवता,बंधुता, भूतदया,शालेय शीस्त,प्रामाणिकपणा आणि आदर्श नागरिकत्वाचे धडे तसेच व्यक्तिमत्त्व विकास इत्यादी उच्चतम मानवी मूल्यांच्या रोपणासाठी दिले जाणारे सहेतूक प्रशिक्षण म्हणजेच स्काऊट गाईड होय.

६) उपक्रम :

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवावयाच्या विविध कार्यक्रमांपैकी एक घटक म्हणजे उपक्रम होय.

१.५) संशोधनाची गृहीतके :

१) शालेय माध्यमिक स्तरावर इ. ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी स्काऊट गाईड हा एक ऐच्छिक उपक्रम आहे.

२) शालेय माध्यमिक स्तरावर स्काऊट गाईड मार्फत विविध उपक्रम राबविले जातात.

३) स्काऊट गाईडच्या विविध उपक्रमांमधून विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक व बौद्धिक क्षमतांचा विकास व्हावा हा हेतू आहे.

४) सर्व माध्यमिक शाळांमधून उत्साही शिक्षक-शिक्षिकांना स्काऊट मास्टर्स तथा गाईड कॅप्टनचे प्रशिक्षण दिले जाते.

५) स्काऊट गाईड उपक्रमांतून विद्यार्थ्यांत देशप्रेम, श्रमप्रतिष्ठा, सहकार्य भावना, बंधुभाव, राष्ट्रीय एकात्मता इ. मूल्ये रूजतात.

१.६) संशोधनाची उद्दिष्टे :-

१) माध्यमिक शाळेतील स्काऊट गाईड अभ्यासक्रमाच्या कार्यप्रणालीच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

२) माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व जडण घडणीसाठी स्काऊट गाईड मार्फत राबविल्या जाणा-या विविध उपक्रमांचा शोध घेणे.

३) माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व जडण घडणीसाठी स्काऊट गाईड मार्फत राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांच्या अंमलबजावणीतील अडचणींचा शोध घेणे.

४) विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व जडण घडणीसाठी स्काऊट गाईड मार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांच्या अंमलबजावणीतील अडचणी सोडविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

५) माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व जडण घडणीत स्काऊट गाईड उपक्रमाची परिणामकारकता तपासणे.

१.७ संशोधन परिकल्पना :

१) शालेय माध्यमिक स्तरावर स्काऊट गाईड उपक्रमाच्या अभ्यासक्रमाची कार्यप्रणाली निश्चित केलेली असावी.

२) शालेय माध्यमिक स्तरावरील स्काऊट गाईड उपक्रमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास होत असावा.

३) शालेय माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी स्काऊट गाईड मार्फत विविध उपक्रम राबविले जात असावेत.

४) विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी स्काऊट गाईड मार्फत आयोजित करावयाच्या विविध उपक्रमांच्या अंमलबजावणी बाबत शिक्षकांना अडचणी येत असाव्यात.

५) शालेय माध्यमिक स्तरावर स्काऊट गाईड हा उपक्रम ऐच्छिक असल्याने विद्यार्थी, शिक्षक व पालकांचे त्याकडे दुर्लक्ष होत असावे.

१.८ संशोधन कार्यपध्दती :

ज्ञान मिळविण्याच्या वैज्ञानिक किंवा शास्त्रीय पध्दतीस संशोधन म्हणता येईल. कारण या पध्दतीत तर्कसंगत विचारप्रणालीचा उपयोग शास्त्रशुध्द पध्दतीने एखाद्या समस्येचे निराकरण करण्यासाठी होतो. संशोधनाचा प्रमुख हेतू हा नवीन ज्ञान निर्मिती करणे हा आहे. तथ्याबाबत नवीन दृष्टिकोन प्रस्तुत करणे, सुधारणा घडवून आणणे तसेच कार्यक्षम नवीन साधने तयार करणे आणि या सर्वांद्वारे ज्ञान वाढवून मानवाच्या प्रगतीला पोषक परिस्थिती, वातावरण निर्माण करणे म्हणजे संशोधन होय. संशोधन करण्याची पध्दती म्हणजेच संशोधन कार्यपध्दती शिक्षण क्षेत्रात केल्या जाणाऱ्या संशोधनाला शैक्षणिक संशोधन म्हणतात.

शैक्षणिक संशोधन विविध पध्दतींनी केले जाते. कालमापनावर आधारित संशोधन पध्दतीचे खालीलप्रमाणे विभाजन केले जाते.

१) भूतकाळाशी संबंधित असणाऱ्या समस्या ज्या पध्दतीने सोडविल्या जातात त्यास ऐतिहासिक संशोधन पध्दती असे म्हणतात.

२) वर्तमानकाळाशी संबंधित असणाऱ्या समस्या ज्या पध्दतीने सोडविल्या जातात त्यास वर्णनात्मक संशोधन पध्दती असे म्हणतात.

३) भविष्यकाळाशी संबंधित जे संशोधन असते ते प्रायोगिक संशोधन पध्दतीने पूर्ण केले जाते. त्यास प्रायोगिक संशोधन पध्दती असे म्हणतात.

सदर संशोधन वर्तमानकाळातील समस्येचा अभ्यास करण्यासाठी नियोजित आहे. त्यासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दती वापरली जाणार आहे. वर्णनात्मक अभ्यासासाठी सर्वेक्षण पध्दतीची निवड सदरच्या संशोधनासाठी करण्यात येणार आहे व सर्वेक्षणाच्या विविध प्रकारांपैकी विद्यालय सर्वेक्षणाचा वापर सदरील संशोधनासाठी केला जाणार आहे.

उद्दिष्ट क्र. १ ते ४ साठी सर्वेक्षण तर उद्दिष्ट क्र. ५ साठी प्रायोगिक पध्दतीचा वापर संशोधक करणार आहे.

१.९ सर्वेक्षण पध्दती :

शिक्षणाची वर्तमान अवस्था व सद्यस्थिती यांच्या अभ्यासाच्या संशोधनासाठी जी पध्दती वापरली जाते त्या पध्दतीस सर्वेक्षण पध्दती असे म्हणतात.

Research or investigation of an educational problem using scientific methods of sampling and carefully planned methods of questioning-survey studies.

सर्वेक्षण पध्दतीमध्ये एका विशिष्ट वेळेच्या परिस्थितीत खूप मोठ्या जनसंख्येच्या संदर्भात माहिती गोळा केली जाते. एका व्यक्तीच्या गुणवैशिष्ट्यांशी याचा संबंध नसतो. सर्वेक्षणाचा संबंध मोठ्या संख्येमधून माहिती काढून त्यावरून निघालेल्या सर्वसामान्य संख्याशास्त्रीय माहितीशी असतो. या पध्दतीत संशोधक हा संपूर्ण जनसंख्येचा अभ्यास न करता

त्यातून निवडलेल्या प्रतिनिधिक प्रतिदर्शकाचा अभ्यास करून प्राप्त आधार सामग्रीच्या आधारे जनसंख्येच्या वैशिष्ट्यसंबंधी सामान्य नियम प्रस्थापित करतो. या अभ्यासास प्रतिदर्शी सर्वेक्षण (Sample Survey) असे म्हणतात. जर संपूर्ण जनसंख्येचा अभ्यास केला तर त्यास जनसंख्या सर्वेक्षण असे म्हणतात.

सर्वेक्षण (Survey), आदर्श मुलक सर्वेक्षण (Normative Survey), स्तर (Status) आणि वर्णनात्मक पध्दती (Descrptive Method) अशा विविध नावांनी सर्वेक्षण पध्दती ओळखली जाते. अभ्यासवस्तूची वर्तमान स्थिती कशी आहे हे पाहण्याकरीता ही पध्दत वापरली जाते. सर्वेक्षण म्हणजे प्रचलित तथ्यांचे संकलन, वर्णन, स्पष्टीकरण आणि मूल्यांकन होय. विभिन्न क्षेत्रातील वर्तमानस्थितीचा शोध घेणे हा सर्वेक्षणाचा हेतू असतो.

सर्वेक्षण पध्दतीच्या पायऱ्या :

१. पहिली पायरी - सद्यस्थितीची जाणीव.

२. दुसरी पायरी - सर्वसामान्य प्रमाणाशी त्या स्थितीशी तुलना करणे.

३. तिसरी पायरी - सद्यस्थितीमध्ये प्रगती घडवून आणणे.

व्यक्तीच्या गुणांकापेक्षा गटाच्या सरासरीचा विचार केला जातो. स्थानिक समस्या सोडविणे व मुलभूत संशोधनास माहिती पुरविणे ही उद्दिष्टे या पध्दतीत असतात. संख्यात्मक व गुणात्मक अशा दोन्ही प्रकारची माहिती पुरविली जाते. संशोधकाला भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी ही पध्दती महत्त्वाची आहे.

सर्वेक्षणातून प्रामुख्याने तीन प्रकारची माहिती संकलित केली जाते.

१) वर्तमान स्थिती

२) अपेक्षित स्थिती

३) आवश्यक साधनांचा बोध

सर्वेक्षणाचे विद्यालय सर्वेक्षण, सर्वेक्षण परीक्षण, सर्वेक्षण वारंवारिता अभ्यास, सर्वेक्षण मूल्यांकन, पाठपुरावा अभ्यास व न्यादर्श सर्वेक्षण असे विविध प्रकार असून सदरील संशोधन कार्यासाठी विद्यालय सर्वेक्षणाचा वापर केला जाणार आहे.

तसेच प्रायोगिक पध्दतीतील कार्यात्मक अभिकल्पातील (Functional Designs) समान गट अभिकल्पाचा वापर दोन गटांच्या तुलनेसाठी करण्यात येईल. समान पात्रतेचे दोन गट निवडून पूर्व चाचणी देऊन एका गटावर प्रायोगिक उपायांचा अवलंब केला जाईल तर दुसऱ्या गटांवर प्रायोगिक उपायांचा अवलंब केला जाणार नाही. म्हणजेच प्रायोगिक गट व नियंत्रित गटाची निवड सदरील प्रयोगासाठी निवडण्यात येईल.

१.१० जनसंख्या :

संशोधकाने नमुना ज्यातून निवडलेला आहे, असा संपूर्ण भाग म्हणजे जनसंख्या होय. सदरील संशोधनासाठी लातूर जिल्ह्यातील जि. प. व खाजगी अनुदानित माध्यमिक मराठी माध्यमांच्या एकूण ६८० शाळांपैकी ४५० शाळेत सदरील उपक्रम चालू आहे अशी माहिती जि.प.शिक्षण विभाग माध्यमिक जि.प.लातूर व स्काऊट गाईड कार्यालय लातूर येथून प्रत्यक्ष भेट देऊन संकलीत केली व स्काऊट गाईड उपक्रम चालू असलेल्या एकूण ४५० शाळांपैकी २५% शाळा म्हणजेच ११३ शाळांची निवड करण्यात येईल. व तेथे कार्यरत असलेल्या १००% स्काऊट गाईड शिक्षकांची व २०% विद्यार्थ्यांची निवड सदरील संशोधन कार्यासाठी करण्यात येईल.

तसेच प्रायोगिक गटासाठी जि.प. प्रशाला हरंगुळ खुर्द ता.जि. लातूर येथील ५० विद्यार्थी व पारंपारिक गटासाठी श्री. देशिकेंद्र विद्यालय, लातूर येथील ५० विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल.

१.११ न्यादर्श :

न्यादर्श म्हणजे संपूर्ण जनसंख्येचा एक भाग असतो. न्यादर्श म्हणजे जनसंख्येचा उपसंच असतो. संशोधक आपल्या संशोधनामध्ये ज्या जनसंख्येच्या विशिष्ट चलांचे निरीक्षण आणि पृथःकरणाद्वारे अभ्यास करणार असतो त्या संख्येचे छोटे प्रमाण म्हणजे नमुना किंवा न्यादर्श होय व त्याची निवड करणे म्हणजे नमुना निवड होय.

सदर संशोधनासाठी सुगम यादृच्छिक पद्धतीचा वापर करून एकूण जनसंख्येमधून ११३ माध्यमिक शाळांची व तेथील १००% स्काऊट गाईड शिक्षकांची आणि २०% विद्यार्थ्यांची निवड सदरच्या संशोधनासाठी केली जाईल. लातूर जिल्ह्यातील सर्व मराठी माध्यमिक शाळेतून सदर निवड करण्यात येईल. तसेच काही निवडक मुख्याध्यापक, स्काऊट मास्टर, गाईड कॅप्टन, विद्यार्थी व स्काऊट गाईड कार्यालयातील काही निवडक अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांच्या मुलाखती घेण्यात येतील.

तसेच प्रायोगिक गटासाठी ५० विद्यार्थी व पारंपारिक गटासाठी ५० विद्यार्थी अशा एकूण १०० विद्यार्थ्यांची निवड प्रयोगासाठी प्रयोज्य म्हणून करण्यात येईल.

१.१२ संशोधनाची साधने :-

संशोधनासाठी जी गृहीतकृत्ये किंवा परिकल्पना निश्चित केली जाते, त्याचे मूल्यांकन करून निष्कर्ष काढण्यासाठी विविध प्रकारची माहिती व आकडेवारी आवश्यक असते, तिला संशोधनाची साधनसामग्री म्हणतात. ही साधनसामग्री विश्वासार्ह व योग्य असावी लागते. तिचे विश्लेषण व निर्वचन करूनच संशोधक संशोधनाचे निष्कर्ष मांडत असतो. संशोधन साधनात मुलाखती, निरीक्षण, प्रश्नावली, शोधक मापिका, पडताळा सूची, पदनिश्चयन श्रेणी, प्रमाणित चाचण्या, समाजमिती, प्रक्षेपण तंत्रे यांचा वापर केला जातो.

सदर संशोधनासाठी प्रश्नावली व मुलाखतीचा वापर केला जाणार आहे.

१.१३ प्रश्नावली :

प्रश्नावली ही प्रश्नांची एक पूर्व नियोजित क्रमाने मांडलेली यादी असते. उत्तर देण्यासाठी अनेक व्यक्तींना पाठविलेली प्रश्नांची यादी म्हणजेच प्रश्नावली होय. यात व्यक्तीकडून प्रश्नांची उत्तरे उलट टपालने किंवा प्रत्यक्ष भेटून गोळा केली जातो.

प्रश्नावलीत पुढील प्रकारच्या गुणात्मक प्रश्नांचा समादेश असणे आवश्यक आहे.

१) अनुभव / वर्तनाधारित प्रश्न.

२) मत, मूल्य, दृष्टीकोण अजमावणारे प्रश्न.

३) भावना जाणणारे प्रश्न.

४) ज्ञान जाणणारे प्रश्न.

५) संवेदनक्षम / अनुभवजन्य प्रश्न.

६) जनसंख्येच्या पार्श्वभूमी संबंधी प्रश्न.

प्रश्नावलीचे प्रमुख प्रकार :

१) असंरचित प्रश्नावली.

२) संरचित प्रश्नावली.

३) बध्द / बंदिस्त प्रश्नावली.

४) मुक्त प्रश्नावली.

५) मिश्र प्रश्नावली.

संशोधनाशी संबंधित योग्य ती प्रश्नावली तयार करून ती मार्गदर्शक व इतर तज्ञांकडून प्रमाणित करून ती संशोधन सामग्री गोळा करण्यासाठी वापरली जाईल.

१.१४ मुलाखती :

मुलाखत तंत्र म्हणजे हवी असलेली माहिती प्रतिसादकाकडून समोरासमोर (Face to Face) परिस्थितीत प्राप्त करणे होय. या तंत्राद्वारे प्रतिसादकाचे विचार, भावना व त्यांचा दृष्टिकोण मनमोकळेपणे व्यक्त होतो.

प्रयोज्या विषयी प्रत्यक्ष माहिती मिळण्याचे हे एक प्रभावी साधन असून समोरासमोरील वैचारिक देवाणघेवाणीमुळे प्रभावी संभाषण, कथन, अनुभव, मत, भावना, समस्या, अभिवृत्ती कळते व नंतर विश्लेषण केले जाते.

मुलाखतीचे प्रश्न :

१) महत्त्वाची माहिती देणारी मुलाखत.

२) अनौपचारिक संभाषणात्मक मुलाखत.

३) दिशादर्शक, मार्गदर्शक मुलाखत.

४) आदर्शयुक्त प्रतिसादक मुलाखत.

५) बंदिस्थ, निश्चित प्रतिसाद मुलाखत.

६) आयुष्यमान / जीवनेतिहास मुलाखत.

संशोधकाने सदरील संशोधन कार्यासाठी काही निवडक स्काऊट मास्टर्स, गाईड कॅप्टन व जिल्हास्तरावरील स्काऊट गाईड कार्यातील काही निवडक अधिकारी, पदाधिकाऱ्यांच्या मुलाखती घेण्याचे निश्चित केले आहे.

१.१५ माहितीचे संकलन :

निवडलेल्या साधनांच्या मदतीने माहितीचे संकलन केले जाईल. जमा झालेली माहिती निष्कर्षासाठी सुव्यवस्थितपणे मांडली जाईल व माहितीचे संकलन केले जाईल. न्यादर्शात निवडलेल्या शाळांना भेटी देवून विद्यार्थी, शिक्षक व मुख्याध्यापकाकडून प्रश्नावली भरून घेण्यात येईल. तसेच शिक्षणक्षेत्रात काम करणा-या तथा जिल्हास्तरावरील स्काऊट / गाईड कार्यालयातील काही निवडक अधिकारी, पदाधिका-यांच्या प्रातिनिधिक स्वरूपात मुलाखतीही घेण्यात येतील. व त्यावरून निष्कर्ष मांडले जातील.

१.१६ संकलीत माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :

सदर संशोधनाच्या माहितीचे संकलन करण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. संशोधनात विद्यार्थ्यांकडून, शिक्षकांकडून व मुख्याध्यापकांकडून माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावलीचा वापर करण्यात येईल.

प्रश्नावलीद्वारे संकलीत माहितीच्या विश्लेषणासाठी शेकडेवारीचा वापर करण्यात येईल. त्याद्वारे निष्कर्ष काढण्यात येईल.

मुलाखतीद्वारे प्राप्त माहितीचाही वापर अर्थनिर्वचनासाठी करण्यात येईल.

१.१७ निष्कर्ष, शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषय :

उद्दिष्टानुरूप निष्कर्ष काढण्यात येतील. विद्यार्थी, स्काऊट मास्टर, गाईड कॅप्टन यांच्या प्रश्नावली व मुलाखतीवरून प्राप्त झालेले निष्कर्ष मांडण्यात येतील. निष्कर्षांवर आधारीत विविध घटकांना शिफारशी केल्या जातील. तसेच पुढील संशोधनासाठीचे विषय सुचविण्यात येतील.

१.१८ प्रकरण योजना :

प्रकरण एक :

प्रकरण एक मध्ये प्रस्तावनेत भूमिका, संशोधन समस्या, समस्या विधान, समस्येची गरज, समस्येचे महत्त्व, संशोधन समस्येच्या कार्यात्मक व्याख्या, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहीतके, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा थोडक्यात मांडण्यात येईल.

प्रकरण दोन :

प्रकरण दोन मध्ये गतसंशोधन व संबंधित साहित्याच्या आढाव्याची गरज, संबंधित साहित्याचा आढावा, विविध वर्तमानपत्रांतून व मासिकांमधून घेतलेले संदर्भ, गतसंशोधन साधनांचा आढावा व संबंधित संशोधनाचे परिशीलन करण्यात येईल.

प्रकरण तीन :

प्रकरण तीन मध्ये संशोधनाच्या कार्यपध्दतीत संशोधनाची कार्यवाही, जनसंख्या, न्यादर्श निवड, संशोधन साधने व निर्मिती, प्रत्यक्ष कार्यवाहीचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण चार :

प्रकरण चार मध्ये माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात येईल. यात प्रश्नावली व मुलाखतीद्वारे प्राप्त माहितीचे निरीक्षण व अन्वयार्थ स्पष्ट करण्यात येईल. सदरील कार्य कोष्टक, रकाने व परिच्छेदात मांडण्यात येईल.

प्रकरण पाच :

प्रकरण पाच मध्ये माहितीच्या विश्लेषण व अर्थनिर्वचनातून निघालेले निष्कर्ष, शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषय सुचविण्यात येतील. विद्यार्थी व शिक्षकांच्या प्रश्नावलीद्वारे प्राप्त झालेल्या माहितीच्या व निरीक्षणाच्या अर्थनिर्वचनावरुन निष्कर्ष काढण्यात येतील व पुढील संशोधनासाठी विषय सुचविण्यात येतील व सारांश स्पष्ट करण्यात येईल.

१.१९ संशोधनाचा कालावधी :

अ.क्र.	संशोधन कार्य	कालावधी	महिने
१	नोंदणी	डिसें. २०१७	१
२	संशोधनाचा अभ्यास	डिसें. २०१७ ते मार्च २०१८	३
३	संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा	एप्रिल २०१८ ते सप्टें. २०१८	६
४	प्रश्नावली, मुलाखत सूची तयार करणे	ऑक्टों. २०१८ ते मार्च २०१९	६
५	माहितीचे संकलन करणे	एप्रिल २०१९ ते सप्टें. २०१९	६
६	माहितीचे अर्थनिर्वचन	ऑक्टो. २०१९ ते मार्च २०२०	६
७	अहवाल लेखन	एप्रिल२०२० ते सप्टें. २०२०	६
८	प्रबंध सादरीकरण	ऑक्टों. २०२० ते डिसेंबर २०२०	३

१.२० खर्चाचे अंदाजपत्रक :

अ.क्र.	**तपशील**	**कालावधी**
१	पीएच्.डी. प्रवेश शुल्क	२००००
२	संबंधित साहित्याचा आढावा	५०००
३	संदर्भ ग्रंथ खरेदी	१५०००
४	झेरॉक्स	१००००
५	टंकलेखन	१५०००
६	संगणक खरेदी	५०००
७	प्रबंध प्रती	२००००
८	कार्यशाळा चर्चासत्र	१००००
९	प्रवास खर्च	३००००
१०	माहिती संकलन	१५०००
११	प्रबंध दाखल करणे	१५०००
	एकूण	**१,६०,०००**

१.२१ संदर्भग्रंथ सूची

१) प्रा.डॉ. घोरमोडे के.यु. आणि घोरमोडे के.के. (२००८), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, विद्या प्रकाशन, नागपूर.

२) डॉ. भिंताडे वि.रा., (२००६), शैक्षणिक संशोधन पध्दती, नित्यनूतन प्रकाशन, पुणे.

३) प्रा. मुळे रा.श., उमाठे वि.तु; (१९९७), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती, मंडळाकरिता, साहित्य प्रसारकेंद्र, सीतावर्डी, नागपूर - १२.

४) प्रा. मुळे सं.ज्ञा., (२०११), शैक्षणिक संशोधनाची ओळख, इनसाईट पब्लिकेशन, नाशिक.

५) प्रा. आलिगावे एम.जी.आणि प्रा. पाटील संदीप, (२०१०), वेध शिक्षण शास्त्रातील स्पर्धा परीक्षांचा, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

६) राज्य चिटणीस, (२०१०), प्रथम सोपान स्काऊट गाईड अभ्यासक्रम, महाराष्ट्र राज्य, भारत स्काऊट्स आणि गाईडस, मुंबई.

७) राज्य चिटणीस, (२०१०), द्वितीय सोपान स्काऊट-गाईड अभ्यासक्रम, महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस आणि गाईडस, मुंबई.

८) राज्य चिटणीस, (२०१०), तृतीय सोपान स्काऊट-गाईड अभ्यासक्रम, महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस आणि गाईडस, मुंबई.

संशोधक

किडीले उमाकांत भीमराव

संशोधन मार्गदर्शक

डॉ. घुले एस.व्ही.
प्राचार्य, महात्मा गांधी अध्यापक
महाविद्यालय, सिडको नवीन नांदेड.